**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**

**शासकीय तंत्रनिकेतन परीसर, गाडगेनगर, अमरावती.**

Email:- ati-jdroamt@sancharnet.in. internet. http://www.jdroamt.org

phone :- 0721-2573027, 2572577 Fax No.0721-2551388

**फॅक्सव्दारे**

क्रमांक :- विकाअ/आस्था/२००९/ १५२

दिनांक: 20/1/09.

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित
अभियांत्रिकी महाविदयालये/तंत्र निकेतने.

विषय:- अपारंपारीक ऊर्जा राष्ट्रीय पातळीचे चर्चासत्र दिनांक ५ व ६ फेब्रुवारी २००९ रोजी आयोजीत करण्याबाबत.

संदर्भ:- अपर आयुक्त तथा सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर यांचे पत्र क्र. विवेविमं/संस-१/ चर्चासत्र/कावि २०/२००९

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, मा. अपर आयुक्त तथा सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर यांनी त्यांचे संदर्भीय पत्रान्वये विदर्भ वैधानिक विकास मंडळ व इन्स्टीटयुट ऑफ इंजिनिअर्स, (इंडीया) नागपूर लोकल सेंटर यांच्या सहभागाने अपारंपारीक उर्जा या विषयावर राष्ट्रीय पातळीचे चर्चासत्र दिनांक ५ व ६ फेब्रुवारी २००९ रोजी इन्स्टीटयुट ऑफ इंजिनिअर्स हॉल, नागपूर येथे आयोजीत करण्यात येत असल्याचे कळविले आहे. तसेच सदरहू चर्चासत्राकरीता अभियांत्रिकी महाविदयालय व तंत्र निकेतनातील किमान १ प्राध्यापक व जास्तीत जास्त विदयार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत सुचीत केले आहे. सदरहू चर्चासत्राचे नोंदणी शुल्क विदयार्थ्यांना रु. १०० व इतर उपस्थिताकरीता नोंदणी शुल्क रु. ३००/- घेण्यात येणार आहे. तरी आपले संस्थेतील संबंधीत विभागातील जास्तीत जास्त प्राध्यापक व विदयार्थ्यांना चर्चासत्राकरीता प्रतिनियुक्त करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहसंचालक तंत्र शिक्षण
अमरावती.

प्रतिलिपी:- १. मा. अपर आयुक्त तथा सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, दक्षिण अंबाझरी रोड, आय.टी. आय. समोर, नागपूर यांना माहितीकरीता सादर.

२. श्री. बी.जी. कान्हेकर, प्रोग्रामर, वि.का.अमरावती यांना सर्व संस्थांना ई-मेल, एसएमएस व दुरध्वनीव्दारा कळविण्यासाठी. (संकेतस्थळी अपलोड करण्याकरीता)